# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in

८७८
जा.क्र.रासनिप्रा/ओळखपत्र/सन २०१४ दिनांक : २९.१०.२०१४

:: आदेश ::

सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी शासनाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठित केले असून राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका होणार आहेत. सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका, रिक्त पदांच्या निवडणूका, पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली पार पाडावयाच्या आहेत. सहकारी संस्थाच्या सर्व प्रकारच्या निवडणूका मोकळ्या व भयमुक्त वातावरणात तसेच अचूक व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याचे धोरण प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

निवडणूक पारदर्शक व निर्दोष पध्दतीने पार पाडण्याचे दृष्टीने मतदार यादीमध्ये मयत सभासदाची नावे नसणे तसेच तोतया मतदान/बोगस मतदान होऊ नये ह्या दृष्टीनेदेखील खबरदारी घेणे गरजेचे आहे. देशभरात केंद्रीय निर्वाचन आयोगाने १९९४ पासून छायांकित ओळखपत्र देण्याचे काम सुरु केले आहे.

त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणूकामध्ये मतदान करताना मतदाराची ओळख पटविणे यासाठी खालील पुरव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्याच्या सुचना मतदान केंद्राध्यक्ष मतदारास करेल व त्यानुसार मतदाराची ओळख पटल्यानंतरच मतदारास मतदान करु देईल.

१. भारतीय / राज्य निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र.
२. पासपोर्ट
३. वाहन चालविण्याचा परवाना
४. आयकर विभागाकडील पॅन कार्ड
५. केंद्र शासन/राज्य शासन/सार्वजनिक उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेले ओळखपत्र
६. राष्ट्रीयकृत बँका/पोस्ट ऑफीस यामधील फोटो असणारे पासबुक
७. स्वातंत्र्य सैनिकांचे ओळखपत्र (फोटोसहीत)
८. सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्ग/विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागासवर्ग इ. फोटोसहीत दिलेले प्रमाणपत्र
९. सक्षम प्राधिकाऱ्याने फोटोसहीत दिलेला अपंगत्वाचा दाखला
१०. मालमत्ताबाबतची कागदपत्रे, तसेच नोंदणीखत इ. फोटोसहीत
११. फोटोसहीत देण्यात आलेला शस्त्रास्त्राचा परवाना
१२. राष्ट्रीय ग्रामीण योजना खालील फोटो असलेले ओळखपत्र
१३. निवृत्त कर्मचाऱ्यांचे फोटो असलेले पासबुक

१४. निवृत्त कर्मचाऱ्यांचे विधवा/अवलंबित व्यक्ती यांचे फोटो असलेले प्रमाणपत्र

१५. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेल्या आरोग्य विमा योजनेचे फोटोसहीत कार्ड

१६. शिधापत्रिका (फोटोसहीत)

१७. आधार ओळखपत्र

उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखपत्राच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत संपूर्ण शहानिशा करेल व आवश्यक वाटल्यास इतर ओळखपत्राच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपूर्णत: खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल. जर एखादा मतदार अशा ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा/कागदपत्र सादर करु न शकल्यास त्यास मतदान करु देवू नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांची असेल.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा. पुणे यांचे आदेशानुसार.**

30/10/14

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य , पुणे

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रति,
१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव - विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे